लोकमत

# जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड

## लाखोंचे वार्षिक पॅकेज : मुलाखतीच्या फेऱ्यांमधून मारली बाजी



रजत मोटघरे अनिकेत नवघडे साक्षी काळे राधिका डाखोरे अनिकेत झाडे गौरव राऊत

लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ** : जवाहरलाल दर्डा एज्युकेशन सोसायटी संचलित येथील जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सहा विद्यार्थ्यांची नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांत निवड झाली आहे. अॅटॉस सिंटेल, कॅपजेमिनी, विप्रो व एक्झोटिक लर्निंग या कंपन्यांमध्ये त्यांना व्हर्च्युअल ऑफ कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे संधी मिळाली आहे.

कंपनीद्वारे ऑनलाइन आणि व्हिडिओ कॉन्फरन्सिंग पद्धतीद्वारे घेण्यात आलेल्या इंटरव्ह्यूमध्ये महाविद्यालयातील सर्व इंजिनिअरिंग शाखेच्या पात्र विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये टेक्निकल इंटरव्ह्यू व पर्सनल इंटरव्ह्यूच्या फेऱ्या घेण्यात आल्या. यातून विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली.

इंजिनिअरिंग शाखेतील रजत मोटघरे याची अॅटॉस सिंटेल, मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखेचा अनिकेत नवघडे, कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड इंजिनिअरिंग शाखेतील साक्षी काळे व राधिका डाखोरे यांची विप्रो, अनिकेत झाडे या विद्यार्थ्याची एक्झोटिक लर्निंग, तर इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग शाखेतील गौरव राऊत याची कॅप जेमिनी या कंपनीत निवड झाली आहे.

अॅटॉस सिंटेलमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्याला ३.४० लाखांच्या वार्षिक पॅकेजवर असोसिएट कन्सलटंट या पदावर, कॅप जेमिनी कंपनीत संधी

वार्षिक पॅकेजवर ॲनालिसिस इंजिनिअर, विप्रो कंपनीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ३.५० लाखांच्या पॅकेजवर प्रोजेक्ट इंजिनिअर, तर एक्झोटीक लर्निंग कंपनीत निवड झालेल्या विद्यार्थ्याला ६.१२ लाखांच्या वार्षिक पॅकेजवर बिझनेस डेव्हलपमेंट असोसिएट या पदावर रुजू करून घेतले जाणार आहे.

नामांकित कंपनीत निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने कौतुक करण्यात येत आहे. मुलाखतीच्या विविध फेऱ्यांना सामोरे जावून त्यांनी घवघवीत यश प्राप्त केले